| | | |
|---|---|---|
| | सत्यमेव जयते<br>**महाराष्ट्र शासन**<br>**आरोग्य सेवा संचालनालय, पुणे** | |

| | | |
|---|---|---|
| संचालक<br>दूरध्वनी क्रमांक<br>कार्यालय दूरध्वनीक्र | २६१२२२५६ (वै)<br>२६१२२५०८ (का)<br>२६११९५७८ (का) | नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला<br>पुणे ४११००१(महाराष्ट्र) पुणे<br>Email ID: dhspune1@gmail.com<br>website: arogya.maharashtra.gov.in |

| | | |
|---|---|---|
| **आरोग्य सेवा** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | जा.क्र.संआसे/कक्ष-८१/ना.नों.प/कक्ष८१/ज.मृ.नोंदणीAdvisory/<br>१५४६३-५०३ /२०२५ दिनांक: ३० /१२/२०२५ |

प्रति

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू
जिल्हा परिषद.......... (सर्व)

२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय .....(सर्व)

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका ...(सर्व)

४) कार्यकारी आरोग्य अधिकारी, महानगरपालिका मुंबई

विषय: पोर्टल / वेबसाइटद्वारे जन्म आणि मृत्यूची ऑनलाइन नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ: १) भारताचे महानिबंधक यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. F.No. १/१२/२०२४-VS-(CRS)/२१३७ दि. १३/१०/२०२५

२) या कार्यालयाचे पत्र क्र.आमाजीआ / ना.नों.प/कक्ष ८१/ ज.मृ.नोंदणी दक्षता/५५४२-५६०७/२५ दि. २२/०५/२०२५

३) या कार्यालयाचे पत्र क्र. आमाजीआ / ना.नों.प/कक्ष ८१/ ज.मृ.नोंदणी Advisory /१३९१९-५८ /२५ दि. ०४ /११/२०२५

४) भारताचे महानिबंधक यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. F.No. १/१३/२०२३ -VS-(CRS)/ दि. २९-१२-२०२५

उपरोक्त विषयान्वये संदर्भीय पत्र १ व ४ नुसार पोर्टल / वेबसाइटद्वारे जन्म आणि मृत्यूची ऑनलाइन नोंदणी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.तसेच जन्म आणि मृत्यू घटनांची CRS Portal या संगणक प्रणालीवर online नोंदणी याबाबत आपणास घ्यावयाची दक्षता यांचेसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार पोर्टल / वेबसाइटद्वारे जन्म आणि मृत्यूची ऑनलाइन नोंदणी करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत आपले अधिनस्त सर्व निबंधक यांना पत्राद्वारे त्वरित अवगत करावे.

१) जन्म मृत्यू नोंदणी करताना निबंधकांनी त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड इतर कोणत्याही अधिकारी /कर्मचारी सोबत शेअर करू नये. जन्म आणि मृत्यूच्या ऑनलाइन नोंदणीसाठी पासवर्ड नियमित बदलण्यात यावा. अशी माहिती शेअर केल्याने पोर्टल/वेबसाइट वापरून अनधिकृत व्यक्तींकडून बनावट जन्म आणि मृत्यु प्रमाणपत्रे जारी केली जाऊ शकतात.

२) उपरोक्त सूचना देवूनही लॉगिन क्रेडेन्शियल्स शेअर करणे अजूनही प्रचलित आहे. राज्यात काही ठिकाणी जिल्हा निबंधक/निबंधक यांच्या पातळीवर लॉगिन आयडी पासवर्ड आणि ओटीपी शेअर केल्यामुळे बनावट प्रमाणपत्रे जारी केल्याची प्रकरणे नोंदवली गेली आहेत.

३) बरेच फेक पोर्टल व वेबसाईट या अधिकृत वेबसाईट सारख्या दिसतात म्हणजेच अनधिकृत व्यक्तींकडून फिशिंग वेबसाईट तयार केलेल्या आहेत त्यांच्या मार्फत अत्यंत संवेदनशील माहिती उदा. पासवर्ड, वैयक्तिक माहिती इ. उघड होवू शकते. URL चा address हा की बोर्ड चा वापर करून टाकण्यात यावा. Search Engine चा वापर करू नये.

४) सदर नोंदणी प्रक्रियेमध्ये कुठलीही फसवी activity किंवा सुरक्षेला धोका होईल अशी activity निदर्शनास आलेस त्वरित त्याची दखल घेऊन चौकशी करावी व दोषी आढळलेस उचित कार्यवाही करावी व त्वरित या कार्यालयास अवगत करावे.

५) CRS पोर्टल वरून जन्म व मृत्यू नोंदणी एकाच अधिकृत संगणकाद्वारे करण्यात यावी. तसेच जन्म मृत्यू नोंदणी चे रेकॉर्ड जतन करण्याचे कामकाज नियमित कर्मचाऱ्याकडेच देण्यात यावे.

या सर्व मार्गदर्शक सूचना जिल्हा निबंधक यांनी त्वरित आपल्या कार्यक्षेत्रात देण्यात याव्यात.

डॉ. विजय कंदेवाड
संचालक, आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू
पुणे, महाराष्ट्र

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१) मा. प्रधान सचिव १, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.

२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुबई.

३) मा. संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई.

४) मा. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई.

५) उपसंचालक, आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, पुणे